WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM



# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार , 23 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 132 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

# अगरतळा येथे मा .श्री. किरण गित्ते साहेब IAS यांच्या निवासस्थानी गणेशोत्सवाचा भक्तिमय उत्साह; राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्यासह उच्च पदस्थ मान्यवरांकडून श्रींचे दर्शन

■ परळी (प्रतिनिधी):

त्रिपुराच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव तसेच सार्वजनिक बांधकाम (PWD), उद्योग व उद्योग व्यवसाय (Industries & Commerce), आरोग्य व कुटुंब कल्याण (Health & Family Welfare) आणि सुशासन व माहिती तंत्रज्ञान (Good Governance & IT) अशा विविध महत्त्वाच्या खात्यांचे सचिव म्हणून कार्यरत असलेले वरिष्ठ IAS अधिकारी श्री किरण गित्ते यांच्या अगरतळा येथील शासकीय निवासस्थानी यंदाचा गणेशोत्सव अत्यंत दिमाखात व पारंपरिक भक्तिमय वातावरणात पार पडला. महाराष्ट्राची समृद्ध आणि गौरवशाली गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा त्रिपुराच्या भूमीत जपण्याचे कार्य गित्ते परिवाराकडून अखंडपणे सुरू आहे.

यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते राज्यातील सर्वोच्च प्रशासकीय व राजकीय मान्यवरांची उपस्थिती. त्रिपुरा राज्याचे महामहिम राज्यपाल श्री. एन. इंद्रसेना रेड्डी जी आणि माननीय मुख्यमंत्री प्रा. डॉ. माणिक सहा जी यांनी गित्ते यांच्या निवासस्थानी विशेष भेट देऊन श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले आणि आरतीमध्ये सहभाग घेतला. याशिवाय राज्याचे विविध माननीय मंत्री, उच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीश, विधानसभा सदस्य, अगरतळा शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि वरिष्ठ पत्रकार बांधव यांनीही आवर्जून उपस्थित राहून श्रींचे दर्शन घेतले. या पावन प्रसंगी श्री किरण गित्ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी तथा विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषा किरण गित्ते यांनी आलेल्या सर्व उच्चपदस्थ पाहुण्यांचे व मान्यवरांचे पारंपरिक महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत आणि आदरतिथ्य केले.





## प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

■ गणेशोत्सवाच्या या पावन सोहळ्यात त्रिपुरातील प्रशासकीय सेवेची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय पोलिस सेवा (IPS), भारतीय वन सेवा (IFS) तसेच केंद्रीय आणि राज्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या परिवार सदस्यांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून महाप्रसादाचा व गणेशोत्सवाचा आनंद लुटला.

## नेत्रदीपक सजावट व मंगलमय वातावरण

■ दक्षिण भारतीय व पारंपरिक धाटणीच्या मंदिराची कलात्मक प्रतिकृती आणि आकर्षक फुलांच्या सजावटीमध्ये विराजमान झालेली श्रींची सुबक व प्रसन्न मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने आणि भावपूर्ण आरतीच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला होता.



# दुष्काळ जाहीर करून शेतकरी-पशुपालकांना तातडीने मदत द्यावी

### आ. सुरेश धस यांची उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे मागणी

■ आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघात तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकरी व पशुपालकांना आवश्यक मदत द्यावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे.

याबाबत आ. धस यांनी मंगळवारी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पावसाअभावी पशुपालकांसमोर चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे.

त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी आ. धस यांनी निवेदनातून केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई, तर पशुपालकांना चारा व पाण्याची उपलब्धता करून देण्यासोबतच आवश्यक शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या प्रश्नांसाठी आमदार सुरेश आण्णा धस यांचा पुढाकार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सकारात्मक चर्चा; प्रलंबित मागण्यांवर तातडीने कार्यवाहीचे आश्वासन

■ आष्टी (प्रतिनिधी)

राज्यातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार, मुकादम तसेच ऊसवाहतूकदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आ.सुरेश धस यांनी पुढाकार घेत मंगळावर दि.22 रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतली. यावेळी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आले.

ऊसतोडणी व वाहतूक क्षेत्राशी संबंधित हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी तसेच आगामी गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचीही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना माहिती देण्यात आली.



यावेळी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेने प्रलंबित मागण्यांची पूर्तता न झाल्यास दि. १ ऑक्टोबर २०२६ पासून राज्यभरातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार, मुकादम व ऊसवाहतूकदार बेमुदत संपावर जाण्याच्या तयारीत असून साखर उद्योगाची गती आणि लाखो कामगारांचे हित लक्षात घेऊन हा प्रश्न संपापूर्वीच मार्गी लावण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी,अशी विनंती आ.धस यांनी फडणवीस यांना केली आहे. यावेळी कामगारांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करत संबंधित मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.


कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आ.सुरेश धस यांनी पुन्हा एकदा ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांच्या हक्काच्या मागण्यांसाठी शासनदरबारी ठाम भूमिका मांडली आहे.या प्रसंगी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष श्री. सुखदेव मारुती सानप, माऊली आप्पा जरांगे, विकास सानप, भरत लवांडे तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पाण्याची समस्या बिकट परळीतील २१९ गणपतींचे चांदापूर तलावात होणार विसर्जन!

■ परळी प्रतिनिधी

शहर आणि परिसरातील तब्बल २१९ गणपती मंडळांच्या गणेशमूर्तींचे यंदा चांदापूर तलावात विसर्जन करण्यात येणार आहे. परिसरात पाण्याची बिकट समस्या निर्माण झाल्याने प्रशासनाकडून खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. गणेश विसर्जन सोहळा शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध गणपती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत चांदापूर तलावातील विसर्जन व्यवस्था, सुरक्षेचे उपाय आणि प्रशासकीय तयारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या बैठकीस तहसीलदार विनोद रणवरे, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण, परळी ग्रामीणचे पोलीस निरीक्षक मल्हारी शिवरकर, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे आणि उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्यासह परिसरातील विविध गणपती मंडळांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. विसर्जनादरम्यान कोणतीही अनचित घटना घडू नये यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था, लाईट्स आणि जीवरक्षक तैनात करण्यात येणार असल्याचे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले. शहरात असणार चार ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र नागरिकांची सोय आणि पर्यावरणपूरक विसर्जनासाठी प्रशासनाने शहरात ४ मुख्य ठिकाणी बेलवाडी छत्रपती शिवाजी महाराज चौक राणी लक्ष्मीबाई टावर गणेशपार.





# शिवनाम जपातून शरीरशुद्धी; शांततेसाठी सामूहिक प्रयत्न करा : सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज

## मुला-मुलींना संस्कारांची शिदोरी द्या; लिंगपूजा, भस्मधारणेची शिकवण देण्याचे आवाहन
## परळीत संत श्री गुरुलिंग स्वामींच्या 125 व्या पुण्यतिथी महोत्सवाची उत्साहात सांगता

■ **परळी वैजनाथ /प्रतिनिधी**

वैद्यनाथनगरी परळी येथे वीरशैव लिंगायत समाज परळी व श्री गुरूलिंग स्वामी देवस्थानच्या वतीने दि. १५ सप्टेंबर पासून सुरू असलेल्या संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी यांच्या १२५ व्या पुण्यतिथी महोत्सव व अखंड शिवनाम सप्ताहाची मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी उत्साहात सांगता झाली. यानिमित्त श्री गुरूलिंग स्वामी महाराजांच्या पालखीचा भव्य सोहळा काढण्यात आला. शिवनामाचा अखंड गजर, 'ॐ नमः शिवाय' गुरुराज माऊलीचा जयघोष, आणि ठिकठिकाणी भाविकांकडून पालखीवर करण्यात आलेली पुष्पवृष्टी यामुळे संपूर्ण परळी शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले.

यावेळी सद्गुरू ष.ब्र.१०८ श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांनी उपस्थित भाविकांना आशीर्वचन देताना सामाजिक व सार्वजनिक शांततेसाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत तसेच शरीरशुद्धीसाठी शिवनामाचा जप करावा, असे आवाहन केले. सिद्ध चैतन्य महाराज म्हणाले की, वीरशैव लिंगायत समाज मोठा आहे. या समाजाच्या पुढील पिढीला चांगले संस्कार देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. समाजातील मुला-मुलींना लहानपणापासून लिंगपूजा, भस्मधारणेसह आपल्या धार्मिक परंपरा आणि संस्कारांची शिकवण दिली पाहिजे. संस्कारक्षम पिढी घडली तरच समाजाची प्रगती अधिक भक्कमपणे होईल. प्रत्येक धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात महिला मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. हीच खरी स्त्रीशक्ती आहे. महिलांप्रमाणेच पुरुषांनीही हिरिरीने प्रत्येक कार्यक्रमात सहभागी होऊन समाजापुढे आदर्श निर्माण करावा, असे आवाहनही सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी केले.

परळी ही ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथाची पावन नगरी आहे. श्रावण मासानिमित्त येथे प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासोबतच शिवाचार्यांचे अनुष्ठान होत असते. अशा पवित्र नगरीत शिवाचार्यांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याचे भाग्य लाभणे ही मोठी गोष्ट आहे, असे सांगत महाराजांनी परळीच्या धार्मिक महत्त्वावर प्रकाश टाकला. मनुष्य जीवन अनमोल आहे. प्रत्येकाने शिवनामाचा जप करावा, भक्तीच्या मार्गाने चालावे; तरच जीवनाचे सार्थक होईल, असा संदेशही त्यांनी दिला.

### शिवनामाच्या गजरात पालखी सोहळा

मंगळवारी सकाळी ९ वाजता श्री वैद्यनाथ मंदिर येथून संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी महाराजांच्या पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला. वैद्यनाथ मंदिर, देशमुखपार, अंबेवेस, गणेशपार, नांदूरवेस, गोपनपाळे गल्ली, आंबेवेस, भोई गल्ली मार्गे पालखी बेलवाडी येथे पोहोचली. पालखी मार्गावर जागोजागी भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले आणि पालखीवर पुष्पवृष्टी केली. 'ॐ नमः शिवाय', 'मन्मथस्वामी महाराज की जय' आणि 'गुरूलिंग स्वामी महाराज की जय' अशा जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

### सात दिवस अखंड शिवनामाचा गजर

■ **मागील सात दिवसांपासून बेलवाडी मंदिर परिसरात अखंड शिवनाम सप्ताहासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पारायण प्रमुख म्हणून श्री दयानंद चौधरी होते. दररोज आरती, शिवनाम जप, धार्मिक प्रवचन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम सुरू होता. मंगळवारी पालखी बेलवाडी येथे पोहोचल्यानंतर प्रवचन, आरती व महाप्रसादाने महोत्सवाची सांगता झाली. या पालखी सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील महिला-पुरुषांसह शहरातील शिवभक्त व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. पालखी सोहळ्यामुळे परळी शहरातील प्रमुख मार्गांवर भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुरूलिंग स्वामी देवस्थानचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरूजी, सचिव अॅड. गिरीषअप्पा चौधरी, प्रा. रामलिंगप्पा काटकर, सोमनाथअप्पा हालगे, विजयकुमार मेनकुदळे, शिवकुमारअप्पा व्यवहारे, शंकरअप्पा उदगीरकर, शिवशंकरअप्पा निर्मळे, अक्षय मेनकुदळे, अॅड. मंदार नरवणे, सौ. मीरा धनंजय कोरे, चंद्रकांतअप्पा उदगीरकर यांच्यासह समस्त वीरशैव लिंगायत समाजबांधव व भगिनींनी परिश्रम घेतले.**








# प्रधानमंत्री पीक विमा योजना : खरीप हंगाम २०२६-२७ च्या पीक कापणी प्रयोगांच्या ऑनलाईन नोंदी वेळेत पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न

■ **बीड प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ च्या पीक कापणी प्रयोगांच्या (Crop Cutting Experiments) सद्यस्थितीचा व तालुका निहाय कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पीक कापणी प्रयोगांची ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत यंत्रणेला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि तालुका कृषी अधिकारी प्रत्यक्ष व दृकश्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून उपस्थित होते. या सर्व यंत्रणांच्या समन्वयाने पीक कापणी प्रयोगांचे काम उत्तम प्रकारे पुढे जात आहे.

बैठकीदरम्यान अंबाजोगाई, आष्टी, बीड, गेवराई, धारूर, पाटोदा, शिरूर, वडवणी यासह विविध तालुक्यांमधील सोयाबीन, मूग, कापूस, बाजरी, तूर आणि इतर पिकांच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील ऑनलाईन नोंदींच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या तालुक्यांमध्ये काही प्रयोग प्रलंबित आहेत, ते काम लवकरात लवकर आणि विहित मुदतीत शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, चालू हंगामात शेतकऱ्यांना पीक




विमा योजनेचा लाभ सुरळीतपणे व वेळेत मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगांची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाने परस्पर समन्वयाने काम करून राहिलेली सर्व प्रलंबित कामे पूर्णत्वास न्यावीत. तसेच ज्या गावांचे 'नो क्रॉप रिपोर्ट' (NCR) किंवा इतर तांत्रिक बाबींमुळे प्रयोग प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून शेतकऱ्यांच्या दाव्यांवर योग्य कार्यवाही होण्यास मदत होईल. महसूल, कृषी आणि पंचायत या तीनही विभागांनी सहकार्याची भूमिका ठेवून पीक कापणी प्रयोगांचे कामकाज अधिक गतिमान करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाची अंगणवाडीला भेट

## राष्ट्रीय सेवा योजना व गृहविज्ञान विभाग यांचा "सेवा माझे योगदान" व "सही पोषण देश रोशन" अंतर्गत पोषण अभियान महासप्ताह उपक्रम

■ **परळी वार्ताहार**

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व गृह विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यांच्या प्रेरणेतून अंगणवाडी क्रमांक 53 व 54 कृष्णानगर, परळी ( वै) या अंगणवाडीस भेट देण्यात आली. ही भेट पोषण आहार व ॲनिमिया याविषयी जनजागृती करण्याचे उद्दिष्ट ठेवून देण्यात आली. या भेटी दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या व गृहविज्ञान विभागाच्या स्वयंसेवक विद्यार्थिनींनी अंगणवाडीतील लहान मुलांचे वजन व उंची मोजून त्यामध्ये कुपोषित बालके आहेत का याचा शोध घेतला. या प्रसंगी लहान मुलांना कोणता व कसा आहार दिला पाहिजे या विषयी गृह विज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. रागिनी पाध्ये यांनी मार्गदर्शन केले. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी व ॲनिमिया टाळण्यासाठी, बालकांची वाढ योग्य होण्यासाठी आहारामध्ये फळे, पालेभाज्या, डाळी व अंडी याचे महत्व सांगून आहार हा संतुलित असावा हे स्पष्ट केले. या वेळी बोलताना राष्ट्रीस सेवा कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. विवेकानंद कवडे यांनी आहारासोबत आरोग्य चांगले ठेवण्यासाठी लहान मुलांच्या खेळण्याकडे लक्ष वेधले. या भेटीच्या वेळी सी डी पी ओ श्री कालिदास बडे, प्रा. डॉ. संध्या आसेगावकर , अंगणवाडी सुपरवायझर सौ. मगर मॅडम, अंगणवाडी सेविका सौ. शुभांगी चाटे ( अंगणवाडी क्र 53) सौ. कालिंदा मंडलिक (अंगणवाडी क्र 54), मदतनीस सौ. सुनंदा चाटे, सौ. उर्मिला ननवरे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या व ग्रहविज्ञान विभागाच्या स्वयंसेवक विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात अंगणवाडीतील उपस्थित विद्यार्थ्यांना पोष्टिक लाडूचे वाटपही करण्यात आले.




# शेकडो सूचनांचा पाऊस ! विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रस्तावावर सखोल आढावा घेणार

## परीक्षा व भरती प्रक्रियेत सुधारणांसाठी टास्क फोर्सचा २४७ विद्यार्थ्यांशी थेट संवाद ! ; निश्चित वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेची सुरक्षितता व पारदर्शक तपासणीची मागणी

■ **छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सने छत्रपती संभाजीनगर विभागातील २४७ विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात थेट संवाद साधला. यावेळी परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तपासणी, पदसंख्या, परीक्षा केंद्रे, निकाल, नियुक्ती, प्रतीक्षा यादी व तक्रार निवारण यासह विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सूचना मांडल्या.

टास्क फोर्सच्या अध्यक्ष तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस समितीचे सदस्य तथा पोलीस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, सदस्य तथा नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे समितीचे सदस्य तथा संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि सदस्य तथा आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे सहभागी झाले. या संवाद कार्यक्रमात सातही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांतून विद्यार्थी ऑनलाइन सहभागी झाले होते.

आज सकाळपासून विद्यार्थ्यांनी विविध गटात भेटी देत अनेक सूचना केल्या. टास्क फोर्स सदस्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सूचनाला गांभीर्याने ऐकून घेतले. विद्यार्थ्यांनी परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे, परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमात वारंवार बदल करू नयेत आणि बदल आवश्यक असल्यास पुरेशी पूर्वसूचना द्यावी, अशी मागणी केली. विविध संवर्गांतील रिक्त पदांची संख्या वेळेत जाहीर करून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, जलसंपदा, वैद्यकीय व दंत वैद्यकीय अधिकारी यांसह अन्य पदांची नियमित भरती करावी, अशी सूचनाही करण्यात आली. एकाच उमेदवाराची अनेक पदांवर निवड झाल्यास पदनिवड व पदाचा त्याग (ऑप्टिंग आऊट) याबाबत स्पष्ट धोरण असावे. तसेच रिक्त पदांवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. प्रश्नपत्रिका निर्मितीपासून छपाई, वाहतूक व वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करावी, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या व्यक्तीलाही परीक्षेचे स्वरूप व प्रश्नपत्रिकेची माहिती मिळणार नाही, अशी व्यवस्था विकसित करावी आणि प्रश्नपत्रिका फुटीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशी सूचना विद्यार्थ्यांनी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व भाषांतरातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञांची मदत घ्यावी. राज्यसेवा मुख्य परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची ठेवावी, प्रश्नांची काठिण्याची पातळी विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी सुसंगत असावी आणि गट-ब व गट-क परीक्षांतील भाषा विषय पात्रता स्वरूपाचे ठेवावेत.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेचे कार्य समाज हिताचे : प्रा.डॉ.गजानन सानप

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा ही संस्था ग्रामीण भागात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सन 1924 साली प्राथमिक आणि माध्यमिक शाळेचे रोपटे श्री अमोलक ऋषी यांच्या पदस्पर्शाने कडा येथे रोवण्यात आले त्यामुळे आजपर्यंत श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेची वटवृक्षात भरभराटी झाली आहे. या संस्थेमध्ये विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सामाजिक आणि शैक्षणिक दायित्व स्वीकारून संस्थाचालक उत्तम प्रकारे कार्य करत आहेत. आज रोजी संस्थेला 100 वर्षे पूर्ण होऊन महाराष्ट्रात नावारूपाला आलेली दायित्व संस्था म्हणुन विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी आदर्श संस्था हा पुरस्कार देऊन संस्थेला गौरविण्यात आलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप, राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य,ॲड. अरविंद केंद्रे, राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य प्रा.नानाभाऊ गोडबोले यांनी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा या संस्थेला सदिच्छा भेट दिली, निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष श्री.योगेशकुमारजी भंडारी, संस्थेचे सेक्रेटरी श्री.हेमंतकुमारजी पोखरणा, कार्याध्यक्ष श्री.कांतीलालजी चानोदिया, कोषाध्यक्ष डॉ.उमेशकुमारजी गांधी, उपाध्यक्ष श्री.अनिलकुमारजी झाडमुथ्था यांच्याशी संस्थेच्या प्रगती विषयी संवाद केला. यावेळी डॉ.गजानन सानप यांनी आपल्या संवादामध्ये असे मत व्यक्त केले की, विद्यापीठ हे केवळ शिक्षण देणारे केंद्र नसून ज्ञान, संशोधन, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. संस्था पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता, पारदर्शक प्रशासन, विद्यार्थी हित आणि संशोधन वृद्धीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, प्राध्यापक, विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात समन्वय ठेवून संस्थेच्या प्रगतीला दिशा देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. तसेच या संस्थेमार्फत चालवले जाणारे सर्व विभाग खरोखर ग्रामीण भागात मोठे कार्य करत आहेत. ही कौतुकाची बाब आहे, महाराष्ट्रामध्ये संस्थेला 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेत या संस्थेचे नाव मोठे आहे. गांधी महाविद्यालयाचे कार्य विद्यापीठामध्ये चांगले आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रात योगदान दिले पाहिजे, त्यामुळे विद्यार्थी आणि समाजाला मोठा फायदा होतो, त्यांनी संस्थेनी केलेल्या कार्याचा उहापोह केला. पुढील काळात संस्थेने व्यावसायिक अभ्यासक्रम वाढवावे यासाठी विद्यापीठ एक



चांगली गुणवत्ताधारक संस्था म्हणून सहकार्य देण्यात येईल, असे आश्वासन डॉ.गजानन सानप यांनी दिले. संस्थेच्या वतीने डॉ.गजानन सानप, प्रा.नानाभाऊ गोडबोले, ॲड.अरविंद केंद्रे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.ज.मो. भंडारी, प्रशासकीय अधिकारी प्रा. नवनाथ पडोळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे सदस्य, प्रोफेसर डॉ.अशोक कोरडे, प्रोफेसर डॉ.शिवराज पातळे, प्रोफेसर डॉ.सुपर्णा देशमुख प्रोफेसर डॉ.आशिष कटारिया, प्रोफेसर डॉ.श्रीकांत मगर, प्रोफेसर डॉ.अनिल गर्जे, प्रोफेसर डॉ.उद्धव चव्हाण, प्रोफेसर डॉ.किशोर कोईनकर, प्रोफेसर डॉ.राधाकृष्ण जोशी तसेच महाविद्यालयातील मोठ्या संख्येने प्राध्यापक उपस्थित होते.



## आष्टीत वाळूची बेकायदा वाहतूक करणारा हायवा पकडला

**आष्टी (प्रतिनिधी) :** आष्टी तालुक्यातील कडा परिसरात विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या हायवा टेम्पोवर आष्टी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत वाहनासह चार ब्रास वाळू असा एकूण १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चालकासह वाहनमालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी (दि. २१) सायंकाळी साडेसातच्या सुमारास कडा परिसरातील शिराळ रोडकडून रुईनालकोल, टाकळी अमिया मार्गे तळेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाळूची बेकायदा वाहतूक होत असल्याची माहिती पोलीस अंमलदार भुतेकर यांना मिळाली. त्यांनी ही माहिती आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांना दिली.

त्यानंतर पोलिसांच्या पथकाने पंचांसमक्ष रात्री सुमारे ८.०५ वाजता कारवाई करत भारत बेंझ कंपनीचा हायवा टेम्पो पकडला. चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव दादासाहेब पांडुरंग मुटकुळे, तर वाहनमालकाचे नाव महादेव बाबासाहेब मुटकुळे, दोघेही रा. मांडवा, ता. आष्टी, जि. बीड असे सांगितले. वाहनातील वाळूसंदर्भात रॉयल्टी पावती अथवा वाहतुकीचा परवाना मागितला असता कोणताही वैध परवाना नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी सुमारे १५ लाख रुपये किमतीचा हायवा टेम्पो आणि २० हजार रुपये किमतीची चार ब्रास वाळू, असा एकूण १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वाहन व वाळू आष्टी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहे. याप्रकरणी चालक दादासाहेब मुटकुळे व वाहनमालक महादेव मुटकुळे यांच्याविरुद्ध वाळू चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार नवले करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले आणि प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सूर्यवंशी, पोलीस हवालदार आहेर, बनसोडे तसेच पोलीस अंमलदार अक्षय लोंढे यांच्या पथकाने केली.

## प्राचार्य शिवदास विधाते यांना शिवस्वराज्य राज्यस्तरीय प्रशासन अधिकारी पुरस्कार २०२६ जाहीर – विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल



**आष्टी (प्रतिनिधी)**

सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि ग्रामीण विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे आष्टी तालुक्यातील शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य शिवदास गोपीनाथ विधाते (महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईनालकोल, ता. आष्टी, जि. बीड) यांना शिवस्वराज्य राज्यस्तरीय प्रशासन अधिकारी पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था, पूनतगांव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर आणि आजी माजी सैनिक कल्याणकारी मंडळ, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देण्यात येतो. संयुक्त विद्यमानाने वीर शहीद जवान शौर्य गौरव व वीर पत्नी सन्मान सोहळा - २०२६ अंतर्गत हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

प्राचार्य शिवदास विधाते यांनी सैनिक जवान, सामाजिक, कला, शैक्षणिक, उद्योजक, साहित्य, कृषी, कवी, वैद्यकीय, विधीतज्ञ, ग्रंथपाल, गायक, वादक, ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

संस्थेच्या प्रतिनिधींनी माहिती देताना सांगितले की, शिक्षण क्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राचार्य विधाते यांनी दिलेले योगदान वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार कृतज्ञतापूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

संस्थेचे पदाधिकारी या निवडपत्रावर अध्यक्ष श्री. संजय रामभाऊ वाघमारे आणि उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब सुरेश शिरसाट यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या पुरस्काराबद्दल प्राचार्य शिवदास विधाते यांचे शैक्षणिक क्षेत्रासह सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस संस्थेच्या वतीने हार्दिक हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## अटींच्या विळख्यात शेतकरी हतबल; विना-अट २ लाखांपर्यंत कर्जमाफी द्या, अन्यथा मनसे शेतकरी सेनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**आष्टी प्रतिनिधी :** शासनाच्या जाचक अटी आणि बँकांच्या व्याजाच्या घोळामुळे आष्टी तालुक्यातील शेतकरी पुरता हतबल झाला आहे. जुलै २०२६ मध्ये विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ च्या महात्मा फुले योजनेतील त्रुटी सुधारून २ लाखांपर्यंत लाभ देण्याची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्ष जमिनीवर याची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, खासबा काष्टी आणि परिसरातील वंचित शेतकऱ्यांना तात्काळ आधार प्रमाणीकरण करून घेऊन, विना-अट २ लाखांपर्यंतची कर्जमाफी द्यावी; अन्यथा बँकांसमोर आणि सहकार निबंधक कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी दिला आहे.सध्या राज्यातील साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या बँक याद्यांमध्ये व्याजाचा मोठा घोळ समोर आला आहे. यामुळे सहकार विभागाने बँकांचे ऑडिट सुरू केले असून, या कर्जमाफीच्या प्रक्रियेला तात्पुरता ब्रेक लागला आहे. शासनाच्या या धोरणामुळे शेतकरी संघटना आणि मनसे शेतकरी सेना कमालीची आक्रमक झाली असून, त्यांनी सरसकट कर्जमुक्तीची मागणी केली आहे.दशकानंतरही शेतकरी कर्जाच्या खाईतच!२०१५ ते २०२६ या एका दशकात शेतकऱ्यांनी सलग तीन कर्जमाफी योजना पाहिल्या. मात्र, तरीही शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होऊ शकलेला नाही. कर्जमाफीच्या नावाखाली बँकांनी लावलेले अतिरिक्त व्याज आणि शासनाचे जाचक नियम यामुळे आष्टी तालुक्यातील सामान्य शेतकरी भरडला जात आहे, अशी तीव्र खंत कैलास दरेकर यांनी व्यक्त केली.मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनखासबा काष्टी व आष्टी परिसरातील अनेक शेतकरी अद्यापही या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. शासनाने तात्काळ प्रशासकीय स्तरावरील त्रुटी दूर करून शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करून घ्यावे आणि कोणतीही अट न घालता २ लाखांपर्यंतची कर्जमाफी थेट मंजूर करावी, अशी मागणी मनसे शेतकरी सेनेने केली आहे. मागण्यांची वेळेत पूर्तता न झाल्यास संबंधित बँका आणि सहकार निबंधक कार्यालयावर मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर आणि स्थानिक शेतकरी नेत्यांनी दिला आहे.

## समव्यवसायिकांचा एकत्रितपणा, जिव्हाळा मनोमन भावला .डॉ . सौ .शालिनीताई कराड

छायाचित्रकार संघटना गणेशोत्सवात निमंत्रित परळीतील महिला डॉक्टरांच्या शुभ हस्ते श्रीगणेश आरती दरम्यान स्त्रीरोग तज्ञ डॉ.सौ. शालिनीताई कराड यांनी हे मनोगत व्यक्त केले.

छायाचित्रकार संघटनेच्या वतीने यावर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. कॅमेऱ्याच्या लेन्स मधून बाहेर येणारा श्रीगणेश असा हा कलात्मक गणपती स्थापन केलेला आहे. गणेशाची मूर्ती भारतातील सर्वात प्रसिद्ध पेण या गावातून या ठिकाणी उपलब्ध झालेली आहे. आणि छायाचित्रकारांनी ग्राहकांना दिलेल्या एका पोज सारखा पोज देऊन छायाचित्रकारांना एस.. रेडी.. टेक.. माय फोटो ..अशा अविर्भावात बसलेल्या या गणेशाची मूर्ती अत्यंत सुबक देखणे आणि मन प्रसन्न करणारी आहे.



श्रीआरती पूर्वी निमंत्रित मान्यवरांचा डॉ. कराड डॉ सौ .तापडिया डॉ .सौ . गंजेवार (भावठाणकर)डॉ. सौ. घुगे या सर्व स्त्री रोग तज्ञांचा महाराष्ट्राचा मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला श्रीआरती नंतर यांना छायाचित्रकारांच्या वतीने स्थापित श्रीगणेशाची छायाचित्र प्रतिबिंबित असलेली सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ .सौ ,कराड यांचा सन्मान छायाचित्रकार संघटनेचे अध्यक्ष. सुनील फुलारी व श्रीगणेश उत्सवाचे अध्यक्ष .महादेव तिडके यांनी केला. तर छायाचित्रकार परिवारातील महिलांनी डॉ.सौ. वैशाली गंजेवार (भावठाणकर) यांचा सत्कार सौ.राठोड व सौ. सोनटक्के व मातोश्री श्रीमती.फड यांनी तर डॉ. सौ.तापडिया यांचा सन्मान सौ.भाले व सौ.चव्हाण यांनी केला.व डॉ.सौ. घुगे यांचा सन्मान सौ.वळसे व सौ.फड यांनी केला.

मनस्वी समाधान व मनाला प्रसन्न करणारा श्रीगणेश पाहून खुपच आनंद झाला. अशा भावना सर्व डॉ.महीलांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी छायाचित्रकार विजापूरे,तिडके,वळसे सोनटक्के ,भाले, चव्हाण ,झिलमेवाड, फड, राठोड, विभुते त्यांचे हे व त्यांचे कुटुंब उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सुनील फुलारी यांनी केले.

# अगरतळा येथे किरण गित्ते IAS यांच्या निवासस्थानी गणेशोत्सवाचा भक्तिमय उत्साह

## राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्यासह उच्च पदस्थ मान्यवरांकडून श्रींचे दर्शन

**परळी (प्रतिनिधी):**

त्रिपुराच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव तसेच सार्वजनिक बांधकाम (PWD), उद्योग व उद्योग व्यवसाय (Industries & Commerce), आरोग्य व कुटुंब कल्याण (Health & Family Welfare) आणि सुशासन व माहिती तंत्रज्ञान (Good Governance & IT) अशा विविध महत्त्वाच्या खात्यांचे सचिव म्हणून कार्यरत असलेले वरिष्ठ IAS अधिकारी श्री किरण गित्ते यांच्या अगरतळा येथील शासकीय निवासस्थानी यंदाचा गणेशोत्सव अत्यंत दिमाखात व पारंपरिक भक्तिमय वातावरणात पार पडला. महाराष्ट्राची समृद्ध आणि गौरवशाली गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा त्रिपुराच्या भूमीत जपण्याचे कार्य



गित्ते परिवाराकडून अखंडपणे सुरू आहे.

यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते राज्यातील सर्वोच्च प्रशासकीय व राजकीय मान्यवरांची उपस्थिती. त्रिपुरा राज्याचे महामहिम राज्यपाल श्री. एन. इंद्रसेना रेड्डी जी आणि माननीय मुख्यमंत्री प्रा. डॉ. माणिक सहा जी यांनी गित्ते यांच्या निवासस्थानी विशेष भेट देऊन श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले आणि आरतीमध्ये सहभाग घेतला. याशिवाय राज्याचे विविध




माननीय मंत्री, उच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीश, विधानसभा सदस्य, अगरतळा शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि वरिष्ठ पत्रकार बांधव यांनीही आवर्जून उपस्थित राहून श्रींचे दर्शन घेतले.या पावन प्रसंगी श्री किरण गित्ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी तथा विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषा किरण गित्ते यांनी आलेल्या सर्व उच्चपदस्थ पाहुण्यांचे व मान्यवरांचे पारंपरिक महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत आणि आदरतिथ्य केले.

### प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

गणेशोत्सवाच्या या पावन सोहळ्यात त्रिपुरातील प्रशासकीय सेवेची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय पोलिस सेवा (IPS), भारतीय वन सेवा (IFS) तसेच केंद्रीय आणि राज्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या परिवार सदस्यांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून महाप्रसादाचा व गणेशोत्सवाचा आनंद लुटला.

### नेत्रदीपक सजावट व मंगलमय वातावरण

दक्षिण भारतीय व पारंपरिक धाटणीच्या मंदिराची कलात्मक प्रतिकृती आणि आकर्षक फुलांच्या सजावटीमध्ये विराजमान झालेली श्रींची सुबक व प्रसन्न मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने आणि भावपूर्ण आरतीच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला होता.



दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र



बीड, बुधवार, 23 सप्टेंबर 2026


# ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा

## पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे दिले निर्देश

## जिल्ह्यातील सर्व जलस्त्रोतांचे ऑडिट करावे ; चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा

**मुंबई |** जालना जिल्ह्यातील सर्व जलस्त्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिले.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्त्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना



शहरांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे पालकमंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

- **चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा**

जालना जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य तूट यांचा समावेश असलेला स्वतंत्र चारा कृती आराखडा तयार करावा. चारा डेपो अथवा चारा छावण्यांची आवश्यकता, जिल्ह्याची चारा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त चारा मिळविण्याचे स्त्रोत निश्चित करावेत. शेजारील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून तेथील चारा उपलब्धतेचा अभ्यास करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

पाणी उपलब्ध असलेल्या भागांतील शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याची व्यवहार्यता तपासून त्याबाबतचा निर्णय प्रस्ताव तयार करावा. चारा छावण्या अथवा अन्य उपायांसाठी राज्यस्तरीय निर्णय आणि निधीची आवश्यकता असल्यास शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा या विषयांवर केंद्रित स्वतंत्र बैठक २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी जलस्त्रोतांचे लेखापरीक्षण, चारा नियोजन, संभाव्य पाणीटंचाईची गावे आणि आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, सर्व जलस्त्रोतांचे लेखापरीक्षण करून संभाव्य पाणीटंचाईची ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल. तसेच पिण्याचे पाणी व चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित करून शेजारील जिल्ह्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वनियोजन करून उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील सर्व पाण्याचे स्त्रोत शोधून त्यांची उपलब्धता व सद्य:स्थितीची माहिती संकलित करून ठेवावी. तसेच, पिक कापणी प्रयोगाच्या आधारेच शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी पिक कापणी प्रयोग गांभीर्याने व अचूकपणे पूर्ण करावेत. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी टंचाईसंदर्भात बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांचे पूर्वनियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

### पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करा

**महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाऊ वापरांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा.टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि परिणामकारक ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.**

# योगेश्वरी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका अंजली कुलकर्णी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## समाजकल्याण आयुक्त दिपाताई मुधोळ-मुंडे यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी चौकटीत न अडकवता,नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊन शिक्षणाची क्षितिजे रुंदावणाऱ्या आणि प्रत्येक विद्यार्थी -पालकाशी आपुलकीचे नाते जपणाऱ्या कै.दे.बा.गणगे योगेश्वरी नुतन प्राथमिक शाळा अंबाजोगाई येथील कार्यशील व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती अंजली वसंतराव कुलकर्णी यांना मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

हा पुरस्कार राज्याच्या समाजकल्याण आयुक्त दिपाताई मुधोळ-मुंडे यांच्या शुभहस्ते त्यांना प्रधान करण्यात आला.

मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परळी शहर व तालुक्यातील अकरा शिक्षकांना हा बहुमानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित



करण्यात येते.यावर्षीच्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अंबाजोगाई येथील कै.देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नुतन प्राथमिक शाळेच्या कार्यकुशल, कर्तव्यदक्ष व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती अंजली रेणुका वसंतराव कुलकर्णी यांची निवड करण्यात आली होती.

रविवार ( दि.२०) रोजी परळी येथील वैद्यनाथ कॉलेजच्या सभागृहात राज्याच्या समाजकल्याण आयुक्त तथा बीड जिल्ह्याच्या तत्कालीन जिल्हाधिकारी आदरणीय श्रीमती दिपाताई मुधोळ-मुंडे यांच्या शुभहस्ते व उद्योजक भरत गीत्ते, मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी.एस. घाडगे, परळी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर, सचिव प्रा.राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव, कार्याध्यक्ष अनंत मुंडे, उपाध्यक्ष अरुण पवार,वैद्यनाथ कॉलेजचे प्राचार्य राठोड सर यांच्या उपस्थितीत प्रधान करण्यात आला.

अंजली कुलकर्णी यांनी परळी येथील भगवान प्राथमिक शाळेत बावीस वर्षे सेवा केल्यानंतर त्या सध्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी नुतन प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत.त्यांना मिळालेल्या या बहुमानाच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# नॅचरल शुगर युनिट 2 च्या 11 व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ संपन्न



**महागाव | प्रतिनिधी**

नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., युनिट नं.2 च्या 11 व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी वाहतूक करणारे कंत्राटदार श्री. सुदर्शन धोंडबाराव शिंदे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रूपाली शिंदे यांचे शुभहस्ते व मा. कृषीरत्न श्री. बी.बी. ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली आणि मा.श्री. पांडूरंगजी आवाड संचालक, मा.श्री.श्रीपाद ठोंबरे, प्रर्वतक नॅचरल शुगर व मा.श्री.बाळासाहेब टेळे, एनसाई मल्टी स्टेट संचालक यांचे उपस्थितीत सोमवार दि.21/9/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता संपन्न झाला.

यावेळी श्री. ठोंबरे म्हणाले की, आपल्या सर्वांच्या सहकार्याने गेल्यावर्षी नॅचरल शुगरने विदर्भात उच्चांकी 5 लाख 55 हजार मे.टन गाळप केले आहे. मागील वर्षी गाळपास आलेल्या ऊसाला नॅचरल शुगरने एफआरपी नूसार ऊस दर शेतक-यांना अदा केला आहे. यावर्षी शेतक-यांनी कारखान्याकडे एकूण 9,994 हेक्टरच्या ऊस नोंदी केलेल्या असून एकूण 7.50 लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यांत आलेले आहे. कारखान्याने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सक्षम तोडणी व वाहतूक यंत्रणा भरणा केली असून दररोज किमान 5500 मे.टन ऊसाचे गाळप होणार आहे. कारखान्याचा येता गळीत हंगाम शुभारंभ ऑक्टोंबर 2026 च्या पहिल्या आठवडयात करण्याचे निश्चित आहे. कारखान्याची गाळप क्षमता वाढल्याने कार्यक्षेत्रातील शेतक-यांनी मोठ्या प्रमाणांत ऊसाची लागवड करावी. यासाठी कारखान्याने शेतक-यांना सुधारीत ऊस जातीची प्रमाणित ऊस रोपे आणि नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर (सेंद्रिय खत) सवलतीच्या दरात शेती गटकार्यालयात उपलब्ध करून दिले आहे.

यांनतर युनिट 2 येथे नव्याने कार्यान्वित झालेल्या बायो सीएनजी प्रकल्पाचा शुभारंभउपस्थित मान्यवराचे हस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी कारखाना परिसरातील मान्यवर सर्वश्री सिताराम ठाकरे, माजी संचालक, गोविंदराव शिंदे वेणी, टिकाराम कदम कलगांव, देविदास पाटील सारहिकन्ही, तानाजी जाधव व, नानाराव पुंडे, सुनिल भवानकर तसेच कारखाना परिसरातील शेतकरी कारखान्याचे अधिकारी किनारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲड . अनंत तिडके यांच्या मातोश्री गयाबाई बाबुराव तिडके यांचे निधन

**आंबेजोगाई |** ॲड. अनंत बाबुराव तिडके यांच्या मातोश्री तथा ज्येष्ठ नागरिक गयाबाई बाबुराव तिडके यांचे २२ सप्टेंबर रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी ७:०० वाजता मूळ गावी रुई (धारूर) येथे अत्यंत शोकाकुल व अश्रूपूर्ण वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.



या दुःखद प्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि न्यायालयीन क्षेत्रांतील अनेक मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. गयाबाई यांच्या पश्चात बाळासाहेब बाबुराव तिडके, ॲड. अनंत बाबुराव तिडके व सुरेश बाबुराव तिडके (शिक्षक) ही तीन मुले, तसेच सुना व नातवंडे असा मोठा परिवार असून त्यांच्या दुखद निधनामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# नेत्रतज्ज्ञ डॉ .एकनाथ शेळके यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' प्रदान

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाईचे नेतृत्व करणारे प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.एकनाथ शेळके यांच्या दीर्घकाळच्या सेवाभावी व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' १७ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे प्रदान करण्यात आला.

बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथील सामान्य कुटुंबातून वैद्यकीय शिक्षण घेत डॉ.शेळके यांनी गोरगरीब व गरजू रूग्णांची सेवा करण्याचे ध्येय जोपासले. एमबीबीएस व एमएस (नेत्र शल्यचिकित्सा) शिक्षणानंतर त्यांनी सन २००७ पासून पुणे येथील शासकीय रूग्णालयापासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत आपल्या सेवाकार्याचा विस्तार केला. नेत्ररोगांच्या उपचारांसोबतच रूग्णांच्या मनातील भीती, वेदना व असहाय्यता समजून घेऊन त्यांना दिलासा




देण्याचे संवेदनशील कार्य त्यांनी केले आहे. अंबाजोगाई, केज, धारूर तसेच ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांत जाऊन मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू निदान शिबिरांच्या माध्यमातून हजारो गरजू रूग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य त्यांनी केले. सन २००६ ते २०२५ या प्रदीर्घ कालावधीत लाखो रूग्णांची तपासणी, योग्य उपचार तसेच शस्त्र क्रियेसंदर्भात मार्गदर्शन करून त्यांनी नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना मोठा आधार दिला. विविध सामाजिक उपक्रम व वैद्यकीय शिबिरांमध्ये विनामूल्य सेवा देत त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविला. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासोबतच 'मोतीबिंदूमुक्त बीड जिल्हा' करण्याचा संकल्पही त्यांनी केला आहे. त्यांच्या अखंड व अतुलनीय नेत्रसेवेचा गौरव म्हणून मराठवाडा समन्वय समिती, पुणे यांच्या वतीने त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल डॉ.एकनाथ शेळके यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.